NR ZALWAR & ASSOCIATES
Plot no.94, Flat no. 7, Basement floor, Meenakshi Apartment, Behind the Ramayana cultural Hall, Ulkanagri, Garkheda parisar, Aurangabad, Maharashtra, India-431009
Contact No.:- 9922287787, 9922287747., e – mail :- niteshrzalwar@gmail.com

FORM-4
ARCHITECT'S CERTIFICATE

Date: 14/02/2020

To,

Shri Hari Housing Resorts and Infra
Plot No 60, Shree Hari Complex,
Opp Mahadev Mandir, Dashmesh nagar
Aurangabad, Maharashtra
RERA No. – P51500020749

Subject: Certificate of completion of Development of "Hari Jyoti Park Part - I" Plotting Project situated on the Gut No 225/Part Satara, Tq. And Dist. Aurangabad demarcated by its boundaries Land of Gut No 221/part to the North Land Gut No 225 Part to the South Land of Gut No 225 and 9 Mter Wide approach Road to the East and Land of gut no 225 part to the West of Satara Tq Aurangabad Division Aurangabad District Aurangabad PIN 431007 admeasuring 8000 Mter sq Mtr Land area being developed by Shri Hari Housing Resorts and Infra, RERA Registration Number P51500020749.

Sir,

1. I Mr. Nitish R Zalawar have undertaken assignment as Architect of certifying completion of Development of "Hari Jyoti Park Part - I" Plotting Project situated on the Gut No. 225/Part Satara, Tq. And Dist. Aurangabad demarcated by its boundaries Land of Gut No 221/part to the North Land Gut No 225 Part to the South Land of Gut No 225 and 9 Mter Wide approach Road to the East and Land of gut no 225 part to the West of Satara Tq Aurangabad Division Aurangabad District Aurangabad PIN 431007 admeasuring 8000 Mter sq Mtr Land area being developed by Shri Hari Housing Resorts and Infra, RERA Registration Number P51500020749.

2. Following technical professionals are appointed by Owner / Promoter:-

   i) Mr. Nitish R Zalawar as Architect.

3. Based on Completion Certificate received from Structural Engineer/ Engineer, and to the best of my/our knowledge I/We hereby certify that Hari Jyoti Park Part - I received self development letter Ja. Kra./MNPA/NARAVI /SSNR/759/2019 from Municipal Corporation Dated 04/05/2019 and NA order from Collector Dated 16/03/2019, as per self development letter all development of Hari Jyoti Part Part-I has been completed in all Aspect. And it ready to give possession of Plots.

Ar. Nitesh R. Zalwar
B.ARCH, M.C.A
Reg. No. CA/2006/39344

Yours Faithfully,
Arch. Nitish R Zalawar

औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

नगर रचना विभाग

☎: २३३३५३६-४०, २३४८००१-०५
P.B.X. २३३१२८१, २३३१२८३
Fax : (०२४०) - २३३१२१३

रेखांकन क्रमांक :-/14/2019

जा.क्र/मनपा/नरवि/ससंनर/ 759 / २०१९ दिनांक :- 04-05-2019

आदेश

श्री. हरी हौसिंग रिसोर्टस ॲण्ड इन्फ्रास्टक्चर तर्फे
श्रीमती परीणीता प्रमोद खैरनार, श्रीमती क्रांती राजकुमार ढमढरे
गट क्रमांक २२५/पैकी मौजे सातारा, औरंगाबाद
द्वारा श्री. नितीश आर. झालवार (आर्कि),
अक्षयदिप प्लाझा, सिडको, औरंगाबाद

यांनी मौजे सातारा औरंगाबाद येथील गट क्रमांक **२२५/पैकी** रेखांकना अंतर्गत विकास कामे स्वत: करण्याच्या (Self Development) धर्तीवर दाखल केलेल्या रेखांकनास सोबतच्या नकाशाप्रमाणे अंतिम मंजूरी खालील अटीवर देण्यात येत आहे.

०१. निवासी भूखंडाचा वापर निवासी व निवासेत्तर भूखंडाचा वापर निवासेत्तर करण्यात यावा. अन्य कोणताही वापर महानगरपालिकेची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये.

०२. रेखांकनातील प्रत्येक स्वतंत्र भूखंडाचे क्षेत्र २५० चौ.मी. पेक्षा कमी असू नये, सेमी डिटॅच भूखंडाचे क्षेत्र १२५ चौ.मी. पेक्षा कमी असू नये व रो-हाऊस भूखंडांचे ५०.०० चौ.मी. पेक्षा कमी असू नये. भूखंडाच्या हद्दीचे दगड हलविण्यात येवु नये.

०३. मंजुर केलेल्या रेखांकनातील कोणत्याही भूखंडाची पुन्हा पोट विभागणी किंवा एकत्रिकरण करावयाचे झाल्यास महानगरपालिकेची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील .

०४ रेखांकनामधील खुली जागा विकास नियंत्रण नियमावलीस अधिन राहून कायमची खुली राहील.

०५. **श्री. हरी हौसिंग रिसोर्टस ॲण्ड इन्फ्रास्टक्चर तर्फे श्रीमती परीणीता प्रमोद खैरनार, श्रीमती क्रांती राजकुमार ढमढरे** यांनी रेखांकनातील खुल्या जागेचे क्षेत्र ८००.२१ चौ.मी. अंतर्गत रस्त्याने बाधित क्षेत्र १९१४.५६ चौ.मी. असे एकूण **२७१४.७७ चौ.मी.** क्षेत्राचे हस्तांतरण महानगरपालिकेस दुय्यम निबंधक (नोंदणी) औरंगाबाद यांच्या कार्यालयात नोंदणी क्रमांक **अगग-३-१३२०/२०१९ दिनांक १९/०३/२०१९** रोजी (रिलीकवीशमेन डिड) अन्वये करुन दिलेली आहे. सदर क्षेत्राची नोंद ७/१२ उताऱ्यावर महानगरपालिकेच्या नावे घेऊन तसा ७/१२ उतारा ६० दिवसाच्या आत सादर करण्यात येईल या बाबत दि. १५/०४/२०१९ रोजी रक्कम रु. १००/- च्या मुद्रांकावर दिलेले प्रतिज्ञापत्र अर्जदार यांच्यावर बंधनकारक राहील. भविष्यात सदर जागेच्या मालकी हक्का बाबत काही वाद उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी रेखांकन धारकांची राहील. हे रस्ते सार्वजनिक रस्ते म्हणून वापरात राहतील.

०६. भूखंडामध्ये बांधकाम नियमाप्रमाणे या कार्यालयाची परवानगी घेऊन करण्यात यावे. तसेच करण्यात येणारे बांधकाम उपविधी (बिल्डींग बाय लॉज) व विकास नियंत्रण नियमावली (डेव्हलपमेंट कंट्रोल रुल) च्या अनुषंगाने करावे लागेल.

०७. भविष्यात रहदारीच्या दृष्टीकोणातून आणखी रस्ता रुंदीसाठी जागेची गरज भासल्यास ती भूमी संपादन कायदा आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतुदी नूसार संपादन करण्यात येईल.

०८. उप अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना भूखंड आखणी करण्यासाठी पत्र क्रमांक जा.क्र./मनपा/नरवि/ससंनर/२०१७/९३२ दिनांक २९/०४/२०१७ द्वारे कळविल्यानूसार त्यांनी प्रकरण क्रमांक/ मो.र.नं./१२६६/२०१७ मोजणी दिनांक ०५/०६/२०१७ द्वारे भूखंड आखणी करुन तसा मोजणी नकाशा पुरविलेला आहे.

०९. भूखंडातून महानगरपालिकेच्या मालकीची जल वाहिनी किंवा भूमीगत गटार गेलेली असेल तर ते स्वखर्चाने स्थलांतर करुन घ्यावी लागेल. अशा जलवाहिनी, भूमिगत गटारावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही.

१०. नैसर्गिकरित्या वाहणारा पाण्याचा प्रवाह जर भूखंडातून जात असेल तर भूखंडाच्या एका बाजुने भुमिगत पाईप लाईन, गटारासाठी मार्ग मोकळा करुन दयावा लागेल. त्यासाठी कोणत्याही प्रकाराचा मोबदला दिला जाणार नाही. हे काम महानगरपालिकेच्या संबंधित विभागाच्या मार्गदर्शनानूसार करावे लागेल.

११. प्रकरणात एकुण जमिन विकास शुल्क रक्कम रुपये **२,९७,५५०/-** च.क्र. **३१५५७७** दि. **१३/०७/२०१६** व उर्वरीत जमिन विकास शुल्क रक्कम रुपये **१,८२,४५०/-** च.क्र. **३३००** दि. २७/०४/२०१७ अन्वये जमा केली आहे.

१२. सदर रेखांकनात महानगरपालिकेची सदर भागातील पाणी पुरवठा व जलनि:सारण योजना पूर्ण झाल्या खेरीज सदर भूखंडांना पाणी पुरवठा व जलनि:सारणाची व्यवस्था करण्यात येणार नाही.

१३. सदर मिळकती करीता अप्पर तहसिलदार, औरंगाबाद यांच्याकडुन म.ज.म.संहिता १९६६ च्या कलम-४२ अ मधील तरतुदीमध्ये जमीनीचा भोगवटा, वर्ग व भार यांच्या विनिश्चतीबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करावे लागेल.

१४. मालकी हक्क, व जमीनीच्या हद्दी इत्यादी बाबत मा. न्यायालयात काही वाद उद्‌भवल्यास त्यांचे परस्पर निराकरण करावे लागेल त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. रेखांकनास विद्यमान पोच रस्त्याबाबत भविष्यात काही वाद उद्‌भवल्यास त्याची जबाबदारी रेखांकन धारकांची राहील, त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

१५. सदर रेखांकनाचा विकास रेखांकन धारकाने स्वत: केलेला आहे. त्या संबंधी महानगरपालिकेच्या संबंधीत विभागाचे कार्यपुर्णत्वाचे प्रमाणपत्र सादर केलेली आहेत.

१६. कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग महानगरपालिका, औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र./मनपा/विद्युत/९६/२०१९ दिनांक ०६/०२/२०१९ नुसार रेखांकनात स्वयम विकास अंतर्गत पथदिवे विद्युतीकरणाचे कामाचे पूढील अटीवर पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. (१) या ठिकाणी वाढीव पथदिवे विद्युतीकरण करण्यात येऊ नये. (०२) पथदिव्यांचे सुरक्षितते बाबत व पथदिवे वेळेवर चालू व बंद करण्याची सर्व जबाबदारी आपल्यावर राहील. तसचे आपणातर्फे बसविण्यात आलेल्या पोलवर, पॅनलबोर्ड जंक्शनबॉक्स, सर्व्हीस वायर, केबल विद्युत संच मांडणीमध्ये विद्युत प्रवाह येऊन व्यक्ती, प्राण्यास अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी (जिवित व वित्तहानी) आपणांवर राहील यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. (३) सदरील पथदिवे ३ वर्ष/ ५०% पेक्षा जास्त भूखंडावर प्रत्यक्ष राहण्यास आल्यानंतर चालु स्थितीत महानगरपालिकेकडे हस्तांतर करणे आपणावर बंधनकारक राहील. पथदिवे महानगरपालिकेकडे हस्तांतरित करेपर्यंत देखभाल दुरुस्तीची संपुर्ण जबाबदारी आपणावर राहील. (४) नियमानुसार पथदिवे महानगरपालिकेकडे हस्तांतरित झाल्यानंतरच सदरील पथदिव्याची देखभाल दुरुस्ती महानगरपालिका प्रशासन करेल. (५) उक्त अटींची पुर्तता न झाल्यास व काही त्रुटी आढळल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द होईल. या बाबत काहीही उजर राहणार नाही.

१७. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा महानगरपालिका, औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र./मनपा/उअ/पापु/झोन क्र. ६,७,८/४७२/२०१८ दि. १४/१२/२०१८ नुसार रेखांकनात जलवाहिनी टाकण्याच्या कामाचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र पूढील आटीवर देण्यात आले आहे. (१) वाढीव पाणी पुरवठा योजना कार्यान्वित होऊन अतिरिक्त पाणी शहरात आल्यानंतरच तसेच त्यावेळेच्या उपलब्ध पाणी परिणाम व परिस्थितीनुसार पाणी पुरवठा सुरु करण्याचा विचार करता येईल. (२) प्रत्यक्ष पाणी पुरवठा सुरु करण्यापूर्वी सर्व अंतर्गत जलवाहिनी बाबतची सपूर्ण जबाबदारी आपणावर राहील. (३) सदरील जलवाहिनी कार्यान्वीत झाल्यानंतर त्याची देखभाल व दुरुस्तीची संपूर्ण जबाबदारी आजीवन कायमस्वरुपी आपणाराव राहील. (४) सदर प्रमाणपत्र म्हणजे पाणी पुरवठा करण्याची हमी नाही.

१८. कार्यकारी अभियंता-०१, महानगरपालिका औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र/मनपा/झोन-८/वार्ड अभियंता/ १६८/२०१९ दि.०१/०३/२०१९ अन्वये मंजुर रेखांकनातील कॉक्रीट रस्ते तयार करणे, मलनि:सारण वाहिनी टाकणे व खुली जागा विकसित करणेसाठी संरक्षित भिंत बांधणे इत्यादी कामाचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र खालील अटींवर पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. (१) मंजुर रेखांकनात स्वयंविकास अंतर्गत रस्त्यांचे कॉक्रीटींग करणेच्या कामाचे दोष दायित्व कालावधी (DLP) हा पाच (०५) वर्षाचा राहील. या कालावधी अंतर्गत रसते खराब झाल्यास अथवा कोणत्याही प्रकारचा दोष आढळुन आल्यास त्याची दुरुस्ती किंवा रस्ता नव्याने बांधणेची जबाबदारी आपणांवर राहील. या कामाचा दोष दायित्व कालावधी दिनांक २०/०२/२०१९ पासुन सुरु झाल्याचे समजण्यात येईल. (२) मंजुर रेखांकनात स्वयंविकास अंतर्गत मलनि:सारण वाहिनी टाकणे व खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामाचे दोष दायित्व कालावधी () हा तीन (०३) वर्षाचा राहील. या कालावधी अंतर्गत मलनि:सारण व्यवस्थे अंतर्गत सर्व दुरुस्तीची कामे करणे व संरक्षित भिंतीच्या कामात काही दोष आढळुन आल्यास दुरुस्त करणेची जबाबदारी आपणांवर राहील. या कामाचा दोष दायित्व आढळुन आल्यास दुरुस्त करणेची जबाबदारी आपणांवर राहील. यामाचा दोश दायित्व कालावधी दिनांक २०/०२/२०१९ पासुन सुरु झाल्याचे समजण्यात येईल.

सहाय्यक संचालक नगर रचना,
०१-१२ महानगरपालिका, औरंगाबाद.

प्रत :-

०१. मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

०२. अतिरीक्त शहर अभियंता वॉर्ड कार्यालय वॉर्ड अ व क, महानगरपालिका, औरंगाबाद यांना माहितीस्तव.

०३. वॉर्ड अभियंता वॉर्ड क, महानगरपालिका, औरंगाबाद यांना माहितीस्तव

०४. मालमत्ता अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना अंतर्गत रस्ते व खुली जागा नोंदणीकृत दस्ताने हस्तांतरीत झालेली आहे संबधि माहितीस्तव.

०५. मुळ संचिकेसाठी.

वाचा :- 1.शासन निर्णय महसुल व वन विभाग क्रमांक एनएपी-2016/प्र.क्र 7/टी-1/मंत्रालय मुंबई दिनांक 22/01/2016

2. मा. आयुक्त महानगर पालिका औरंगाबाद यांचे विकास परवाना क्रमांक जा.क्र./मनपा/नरवि/ससंनर/2017/132 दिनांक 21.04.2017.

2. अर्जदार श्री. हरी हौ. रिसोर्टस ॲण्ड इन्फ्रास्क्टचर तर्फे श्रीमती परिणीता प्रमोद खैरनार व क्रांती राजकुमार ढमढेरे, रा. जयनगर औरंगाबाद यांचा अर्ज दिनांक 31.07.2018.

जा.क्र. 2019/जमा-2/परि.ब./सिआर-25 दिनांक /12/2018. 16/03/2019

परिशिष्ट ब

महाराष्ट्र जमीन महसुल संहिता 1966 च्या कलम - 42 अ मधील तरतुदीअन्वये नियोजन प्राधिकरणाने बांधकाम/विकास परवानगी दिली आहे अशा जमीनीच्या भोगवटदारास दयावयाची सनद

ज्याअर्थी जिल्हा औरंगाबाद तालुका औरंगाबाद मौजे च्या सर्व्हे क्रं/ **सातारा गट** क्रं/न.भु.क्रं/सि.स.न. **225 मधील क्षेत्रफळ 8000.00 चौ. मी.** या जमीनीच्या भोगवदाराने महाराष्ट जमीन महसुल संहिता 1966 च्या कलम 42-अ च्या तरतुदींन्वये मौजे **सातारा** या **निवासी**/वाणिज्य/अन्य अकृषिक प्रयोजनासाठी सदर जमीनीचा विकास करण्यास महानगरपालिका औरंगाबाद या नियोजन प्राधिकरणाच्या जा.क्र./मनपा/नरवि/ससंनर/2017/132 दिनांक 21.04.2017 अन्वये **विकास**/बांधकाम परवानगी प्राप्त केली आहे, ज्या संबंधी नियोजन प्राधिकरणाने मंजुर केलेला नकाशा या सनदेसोबत संलग्न आहे.

ज्याअर्थी उक्त जमीनीच्या भोगवटादाराने शासनाला, उक्त संहितेच्या कलम 47-अ नुसार देय रुपांतरण कराची व वर नमुद अकषीक प्रयोजनार्थ वापरापोटी आकारणीची रक्कम चालन क्रं **MH008841237201819M** रक्कम रुपये **49920/- (अक्षरी एकोनपन्नास हजार नऊशे वीस फक्त)** दिनांक 04/12/2018 रोजी भरणा केली आहे.

त्याअर्थी आता, उक्त संहितेमधील तरतुदीच्या आणि तदन्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींना आणि खालील शर्तीना अधीन राहुन उपरोक्त जमीनीच्या भोगवटादारास सदर नियोजन प्राधिकाऱ्याच्या वर उल्लेखित विकास/बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने सदर जमीनीवर अनुज्ञेय करण्यात आलेल्या अकषिक वापरापोटी उक्त संहितेच्या कलम 42-अ अन्वये ही सनद देण्यात येत आहे.

1. आकारणी : उक्त जमीनीचा भोगवटदारा उक्त जमीनीच्या संबंधात या अगोदर वसुली योग्य असलेल्या आकारणीऐवजी वर उल्लेखित विकास/बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यापासुन दिनांक 31 जुलै 2019 (वर्ष) रोजी संपणाऱ्या हमीच्या कालावधीत शासनाला

प्रत्येक वर्षी रु.1.04 पैसे निवासी प्रयोजनासाठी प्रति चौ. मी. या दराने परिगणीत होणारी वार्षिक आकारणी देईल आणि उक्त कालावधी संपल्यानंतर उक्त संहिते अन्वये जिल्हाधिकारी यांचे कडुन वेळोवेळी निश्चीत करण्यात येईल, अशी सुधारीत आकारणी देईल.

2. उक्त जमीनीचा भोगवटदार उक्त जमीनीवर वसुली योग्य असलेले सर्व कर,दुर आणि उपकर भरील.
3. वरिल मंजुर केलेल्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्राधिकरणाच्या पुर्व मंजुरीशिवाय कोणताही बदल करु नये व ही सनद निर्गमित झाल्यानंतर नियोजन प्राधिकरणाच्या पुर्व मान्यतेने सदर जमीनीच्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची माहीती, असा बदल नियोजन प्राधिकरणाकडुन मंजुर झाल्यापासुन 30 दिवसांच्या आत जिल्हाधिकारी यांना देणे भोगवटदारावर बंधनकारक राहील.
4. उक्त जमीनीच्या भोगवटदाराने पुर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्या जिल्हाधिकाऱ्यास, उक्त संहितेच्या आणि तदन्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींअन्वये जी भरण्यास उपयोगकर्ता दायी असेल अशी इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता त्यास योग्य वाटेल अशी आकारणी भरल्यावर आणि कलम 329 च्या पोट कलम (2) च्या अधीनतेने, त्यास योग्य वाटेल एवढा दंड भरल्यावर उक्त जमीनी भोगवटादार याच्या वहिवाटीत असल्याचे चालु ठेवला येईल.

त्याची साक्ष म्हणुन **अपर तहसिलदार औरंगाबाद** या ठिकाणी **महाराष्ट्र राज्यपाल यांच्या वतीने स्वाक्षरी केली आहे आणि त्यांच्या पदाची मोहोर लावली आहे आणि अर्जदाराने सुध्दा दिनांक /12/2018 रोजी त्याची स्वाक्षरी येथे केलेली आहे.**
15/03/2019

श्री. हरी हौ. रिसोर्टस ॲण्ड इन्फ्रास्टकचर
तर्फे श्रीमती परिणीता प्रमोद खैरनार

क्रांती राजकुमार ढमढेरे

साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या व पदनामे

1. प्रताप भाऊसाहेब देशमुख.

2. संतोष भालचंद्र चव्हाण.

आम्ही जाहिर करतो की, ज्याने या सनदेवर स्वत: म्हणुन स्वाक्षरी केलेली आहे ती, **श्री. हरी हौ. सिसोर्टस अॅण्ड इन्फ्रास्टकच्र तर्फे श्रीमती परिणीता प्रमोद खैरनार व क्रांती राजकुमार ढमढेरे रा. जयगनर औरंगाबाद,** व्यक्ती तीच व्यक्ती आहे आणि त्याने या ठिकाणी आमच्या समक्ष त्याची स्वाक्षरी केलेली आहे.

साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या व पदनामे

1. प्रताप भाऊसाहेब देशमुख.

2. संतोष भालचंद्र चव्हाण.

रमेश मुंडलोड
अपर तहसिलदार
अपर तहसिल कार्यालय औरंगाबाद

प्रतिलीपी :- (माहीती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव)

1. मा जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद.
3. सहाय्यक संचालक नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद.
4. अधिक्षक, भुमि अभिलेख, औरंगाबाद.
5. नगर भुमापन अधिकारी औरंगाबाद.
6. अर्जदार श्री. हरी हौ. सिसोर्टस अॅण्ड इन्फ्रास्टकच्र तर्फे श्रीमती परिणीता प्रमोद खैरनार व क्रांती राजकुमार ढमढेरे रा. जयगनर औरंगाबाद यांना माहितीस्तव.
7. तलाठी साझा सातारा ता जि औरंगाबाद यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.

रमेश मुंडलोड
अपर तहसिलदार औरंगाबाद


BLOCK PLAN
LAYOUT PLAN
SCALE:- 1:500
KEY MAP
GUT PLAN
AREA STATEMENT
TITLE
DEMARCATED RESIDENTIAL LAY-OUT
HARI - JYOTI PARK" - (PART-4)
OF GUT No. 233 (PT)
AT VILLAGE - SATARA,
TQ. & DIST. AURANGABAD.